# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २६ / १० /2021

### //गोषवारा//

प्रकरण क्र. ५८ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सिस्टीम मॅनेजर (गट-अ) व लेखाधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार सिस्टिम मॅनेजर (गट-अ) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| श्रेणी - 01 तांत्रिक सेवा | सिस्टिम मॅनेजर | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सिस्टिम ॲनालिस्ट या पदावर किमान 5 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार लेखाधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| श्रेणी - 2 लेखा सेवा | लेखाधिकारी | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखापाल या पदावर किमान 5 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा परिक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार सिस्टिम मॅनेजर या संवर्गातील एकुण 01 पद व लेखाधिकारी या संवर्गातील एकूण 02 पदे मंजूर असून मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार सिस्टिम मॅनेजर (गट-अ) चे एकुण 01 पद व लेखाधिकारी (गट-ब) चे एकूण 02 पदे ही 100% पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.उ (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

सिस्टीम मॅनेजर (गट-अ) व लेखाधिकारी (गट-ब) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.30/08/2021 रोजी आयोजित करण्यात आली होती.

सिस्टीम मॅनेजर (गट-अ) व लेखाधिकारी (गट-ब) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तींच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. राजकुमार घरत,<br>सिस्टीम ॲनालिस्ट<br>S-15 41800-132300 | सिस्टीम मॅनेजर | खुला | S-20 56100-177500 |
| 2. | श्री. उत्तम तारमळे,<br>लेखापाल<br>S-13 35400-112400 | लेखाधिकारी | खुला | S-15 41800-132300 |

सिस्टीम मॅनेजर हे गट-अ संवर्गातील व लेखाधिकारी हे गट-ब संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे. त्यामुळे सिस्टीम मॅनेजर (गट-अ) व लेखाधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार वर्ग-01 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे सिस्टीम मॅनेजर (गट-अ) या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा. महासभेच्या मंजुरीस्तव सादर.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका